पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे

# मामासाहेब मोहोळ महाविद्यालय,

पौड रोड, पुणे- ३८

## वार्षिक अहवाल - २०२४-२५

# अर्थशास्त्र विभाग

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये अर्थशास्त्र विभागात द्वितीय वर्ष कला या वर्गात एकूण ४० विद्यार्थी प्रवेशित असून तृतीय वर्ष कला या वर्गात २० विद्यार्थी प्रवेशीत आहेत पदव्युत्तर विभागात एम ए भाग १ आणि भाग २ मिळून एकूण ०८ विद्यार्थी प्रवेशित आहेत.

पदवी व पदव्युत्तर विभागातील विद्यार्थ्यांना अर्थशास्त्र या विषयाची सखोल व अद्ययावत माहिती मिळावी यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे उपक्रम विभागाच्या वतीने राबविले जातात.

१) **जागतिक लोकसंख्या दिन:** दिनांक ११ जुलै २०२४ रोजी जागतिक लोकसंख्या दिन साजरा करण्यात आला त्यानिमित्ताने वाढत्या लोकसंख्येचे परिणाम या विषयावर डॉ. आशा खिलारे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते, अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा डॉ मेघना भोसले यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले डॉ. आदिनाथ पाठक यांनी प्रमुख वक्त्यांची ओळख करून दिली विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रा. लक्ष्मण उकिर्डे यांनी आभार मानले. सदर कार्यक्रमासाठी अर्थशास्त्र विभागातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

२) **वित्तीय साक्षरता :** दिनांक १७ ऑक्टोबर २०२४ रोजी एकदिवसीय वित्तीय साक्षरता वेबनार कार्यक्रमाचे आयोजन अर्थशास्त्र विभाग व Advisor Organization यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आधुनिक काळात वित्तीय साक्षरता हि अत्यंत महत्वाची असून विद्यार्थ्यांना त्याची माहिती आणि महत्व या विषयाची सखोल ओळख होण्यासाठी मनदीप सिंह यांनी मार्गदर्शन केले. अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा डॉ मेघना भोसले यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले प्रा. अंकुश उकिर्डे यांनी प्रमुख वक्त्यांची ओळख करून दिली. प्रा. मयूर मोरे यांनी आभार मानले. सदर कार्यक्रमासाठी अर्थशास्त्र विभागातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

३) **इंटर्नशिप मार्गदर्शन-** तृतीय वर्ष कला या वर्गातील विद्यार्थ्यांना बँकिंग या विषयाकरिता इंटर्नशिप ही सक्तीची असून प्रत्येक विद्यार्थ्याला त्या बाबतची सखोल माहिती मिळावी यासाठी शाहू महाविद्यालयाच्या प्रा. नेहा नलावडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. या व्याख्यानासाठी ४२ विद्यार्थी उपस्थित होते. या व्याख्यानाचे आयोजन बँकिंग विषयाचे प्रा उकिर्डे एल जी. आणि प्रा मयूर मोरे यांनी केले.

Scanned with OKEN Scanner

४) **व्याख्यान :विमा क्षेत्रातील करिअर च्या संधी** : १५ जानेवारी २०२५ रोजी अर्थशास्त्र विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी विमा क्षेत्रातील करिअर च्या संधी या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. वरील कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. शर्मिला चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली विभाग प्रमुख डॉ. मेघना भोसले व सहकारी प्राध्यापक डॉ आदिनाथ पाठक, प्रा. दिपाली फड, प्रा. कुमुदिनी पाटील , प्रा मयूर मोरे यांनी केले.

५) **संशोधन मार्गदर्शन**: १२ जानेवारी द्वितीय वर्ष कला आणि एम ए अर्थशास्त्र भाग २ या वर्गातील विद्यार्थ्यांना संशोधन पद्धती हा विषय अभ्यासासाठी असून, त्या विषयाचे सखोल मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळावे यासाठी प्रा प्रविण पोतदार याचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना संशोधनाची ओळख व आवड निर्माण व्हावी याकरिता हे व्याख्यान उपयुक्त ठरले.

६) **केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ Live प्रक्षेपण** : अर्थशास्त्र विभागाच्या वतीने दिनांक १ फेब्रुवारी २०२५ रोजी केंद्रीय अर्थसंकल्पाचे विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांसाठी Live प्रक्षेपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. देशाच्या वित्त मंत्री निर्मला सीतारामन यांनी जो २०२५ चा अर्थसंकल्प सादर केला,त्या अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदीवर चर्चा करण्यात आली. वरील कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. शर्मिला चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली विभाग प्रमुख डॉ. मेघना भोसले व सहकारी प्राध्यापक डॉ आदिनाथ पाठक, प्रा. दिपाली फड, प्रा. कुमुदिनी पाटील , प्रा मयूर मोरे यांनी केले.

७) **शैक्षणिक सहल** : दिनांक ७ फेब्रुवारी २०२५ रोजी अर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागात आयोजित 'Budget Exhibition' या कार्यक्रमासाठी शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. वरील कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. शर्मिला चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली विभाग प्रमुख डॉ. मेघना भोसले व सहकारी प्राध्यापक डॉ आदिनाथ पाठक, प्रा. दिपाली फड, प्रा. कुमुदिनी पाटील , प्रा मयूर मोरे यांनी केले.

८) **केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ चर्चासत्र व पोस्टर सादरीकरण स्पर्धा**: दिनांक ४ फेब्रुवारी रोजी अर्थशास्त्र विभागाने केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ चर्चासत्र व पोस्टर सादरीकरण स्पर्धा आयोजित केली होती.वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. प्रकाश हुंबाड यांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर याविषयावर मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थ्यांनी पोस्टर सादरीकरण केले.प्रा. कुमुदिनी पाटील यांनी 'Budget' या शब्दाची ऐतिहासिक पार्श्वभूमी सांगितली. महविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शर्मिला चौधरी यांनी या प्रसंगी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. वरील कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. शर्मिला चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली विभाग प्रमुख डॉ. मेघना भोसले व कार्यक्रमाचे समन्वयक डॉ आदिनाथ पाठक होते, प्रा. दिपाली फड यांनी आभार प्रदर्शन केले , प्रा मयूर मोरे यांनी सूत्रसंचालन केले.

विभाग प्रमुख

Head
Department of Economics
Mamasaheb Mohol College,
Paud Road, Pune-38.

Scanned with OKEN Scanner